
फ्लॉरेन्स नाइटिंगेल



लेखक: डेव्हीड ॲडलर; चित्र: जॉन आणि अलेक्झांड्रा वॉलनर; मराठी: सुशील मेन्सन

*फ्लॉरेन्स नाइटिंगेल*चा जन्म 12 मे 1820 रोजी इटली देशातील फ्लॉरेन्स या शहरात झाला. तिच्या आईवडिलांनी या शहराच्या नावावरुनच तिचे नाव ठेवले. तिची बहीण *पार्थेनोप* ही तिच्या एक वर्ष आधी इटलीच्याच नेपल्स या शहरात जन्मली. तिचेही नाव आईवडिलांनी त्या शहरावरूनच ठेवले. नेपल्सला ग्रीक भाषेत पार्थेनोप म्हणतात.

फ्लॉरेन्सचे आईवडील फॅनी आणि विल्यम नाइटिंगेल, यांची मातृभूमी इंग्लंड होती. योगायोगाने, ते इटलीमध्ये प्रवास करत असताना त्यांच्या दोन्ही मुलींचा जन्म झाला.



नाइटिंगेल कुटुंब श्रीमंत होते. त्यांच्याकडे बरेच नोकर-चाकर होते. ते लंडनजवळ *एम्बले पार्क* नावाच्या आलिशान घरात राहात होते. उन्हाळ्यात ते *लीआ हर्स्ट* नावाच्या दुसऱ्या एका घरी राहायला जात असत. फ्लॉरेन्स आणि तिची बहीण पार्थेनोप यांना खाजगी शिक्षक आणि त्यांचे वडील घरच्याघरीच शिकवत असत.

बालपणी फ्लॉरेन्स खूप गोंडस होती. तिची कल्पनाशक्ती उत्तम होती. दिवसभर ती स्वप्नांमध्ये हरवलेली असे. कधी कधी ती स्वत:ला राक्षस किंवा शूर नायिका मानत असे. ती अभ्यासात हुशार होती, विशेषत: गणितात. तिला लेखन करायलाही आवडत असे. ती रोजनिशी व पत्रे लिहीत असे आणि नेहमी कागदाच्या तुकड्यांवर काहीतरी खरडत बसलेली असे.







12 जुलै 1830 रोजी सूर्यास्ताचे दृश्य पाहिल्यावर फ्लॉरेन्सने लिहीले, “प्रथमच परमेश्वरावर माझी श्रद्धा जडली.” सात वर्षांनंतर 7 फेब्रुवारी 1837 रोजी तिने लिहीले, “परमेश्वराने त्याची सेवा करण्यासाठी मला बोलावलंय.” पण तिला स्वत:लाही या सेवेबद्दल निश्चित माहित नव्हते.


सप्टेंबर 1837 साली नाइटिंगेल कुटुंबाने फ्रान्स, इटली व स्वित्झर्लंड देशांत प्रवास केला. तिथे ते संगीत मैफिली, ऑपेरा आणि अभिरुचीसंपन्न लोक अशा वातावरणात वावरले. त्यावेळी फ्लॉरेन्स सतरा वर्षांची होती आणि खूप लोकप्रिय होती. 1839 साली फ्लॉरेन्स आणि तिची बहीण यांना इंग्लंडची महाराणी व्हिक्टोरिया यांना भेटण्याची संधी मिळाली.






अनेक तरुणांना फ्लॉरेन्स आवडत असे. तिने डायरीत लिहून ठेवले आहे, “रिचर्ड मिल्नस मला खूप आवडतो.” रिचर्डने कित्येकदा फ्लॉरेन्सला लग्नाबद्दल विचारले. पण फ्लॉरेन्स त्याला सतत नकार देत राहिली.

“मला जाणवत होतं की मी त्याच्यासारखं आयुष्य जगुच शकत नाही,” फ्लॉरेन्स लिहिते. रिचर्ड मिल्नस खूप श्रीमंत होता. तिने त्याच्याशी लग्न केले असते तर तिच्या आईसारखेच आयुष्य तिच्या वाट्याला आले असते. फ्लॉरेन्सला आपले आयुष्य घर सजवण्यात आणि निरर्थक गप्पाटप्पा करण्यात व्यर्थ घालवायचे नव्हते.



1840 चे दशक इंग्लंडसाठी फार वाईट गेले. लोक भुकेकंगाल होते. हॉस्पीटल आणि तुरुंग खचाखच भरले होते. फ्लॉरेन्सने गरीब लोकांच्या घरांना भेटी दिल्या. तिने त्यांच्यासाठी अन्न, कपडे आणि औषधे नेली. तिने आजारी रुग्णांना मदतही केली.

1844 साली, वयाच्या चोविसाव्या वर्षी, फ्लोरेन्सने निश्चय केला की आपण नर्स बनायचे आणि हॉस्पीटलमध्ये सेवा करायची. तिने डायरीत लिहिले, “हे परमेश्वराचं कार्य आहे.” डिसेंबर 1845 मध्ये तिने आपल्या आईवडिलांना आपली ही इच्छा सांगितली.








त्या काळात हॉस्पीटल खूप गलिच्छ आणि दुर्गंधित असत. वेदनांपासून आराम मिळावा, म्हणून रुग्ण व्हिस्की पीत असत. अनेक नर्सदेखील दारू पीत असत. त्यांना आजारांबद्दल फारसे ज्ञान नसे. बहुतेकदा नोकर-चाकरच रुग्णांना आंघोळ घालत आणि त्यांच्यासाठी जेवण बनवत. फ्लोरेन्सचा निर्णय ऐकून नाइटिंगेल कटुंब धास्तावले. त्यांनी फ्लोरेन्सची नर्स बनण्याची इच्छा मान्य केली नाही .




फ्लोरेन्सचे स्वप्न जणू बेचिराख झाले. तिला खूप दु:ख झाले. कित्येक दिवस ती झोपली नाही. तिचे वजन कमी होऊ लागले. 5 डिसेंबर 1845 रोजी तिने एका पत्रात लिहिले, “मी धुळीसमान आहे. मी कशासाठीही लायक नाही.....असं वाटतं, माझा आत्मा अश्रुंमध्ये मिसळून वाहून जाईल.” पण फ्लॉरेन्सने आपले स्वप्न उराशी धरुन ठेवले.

जून 1951 मध्ये फ्लॉरेन्सच्या आईवडिलांनी तिला जर्मनीत नर्सिंगचे प्रशिक्षण घेण्याची परवानगी दिली. त्यावेळी तिचे वय होते 31 वर्षे. सरतेशेवटी, तिने आपल्या आयुष्याला अर्थ मिळवून देणारे काम सुरू केले.








1853 सालच्या सुरुवातीस फ्लॉरेन्स पॅरिसला गेली. तिने तिथे अनेक हॉस्पीटलना भेटी दिल्या. तेथील डॉक्टरांना काम करताना जवळून पाहिले. वर्षाअखेरीस, तिला लंडनमधील एका महिलांच्या छोट्याशा हॉस्पीटलमध्ये व्यवस्थापक म्हणून नेमण्यात आले. तिथे आजारी स्त्रियांवर उपचार केले जात असत.

फ्लॉरेन्सने हॉस्पीटलच्या स्वच्छतेला प्राधान्य दिले. केवळ *चर्च ऑफ इंग्लंडच्या* सदस्यांसाठीच असलेले हे हॉस्पीटल फ्लॉरेन्सने सर्व रुग्णांना खुले केले.







1854 साली रशियाविरुद्ध सुरू असलेल्या क्रिमियन युद्धात इंग्लंडही सामील झाला. युद्धात जखमी झालेल्या व आजारी पडलेल्या इंग्लंडच्या सैनिकांना ठेवण्यासाठी पुरेसे पलंग आणि डॉक्टर नव्हते. तिथे मेणबत्त्या, मलमपट्टया आणि नर्सदेखील कमी होत्या. 15 ऑक्टोबर 1854 रोजी इंग्लंडच्या युद्ध सचिवाने फ्लॉरेन्स नाइटिंगेलला नर्सचा एक गट क्रिमियाला घेऊन जाण्याची विनंती केली. आठवड्याभरातच, फ्लॉरेन्स क्रिमियाला गेली.


फ्लॉरेन्स तुर्कस्थानमधील स्कुटारी शहराच्या हॉस्पीटलमध्ये पोहोचली तेव्हा तेथील दयनीय अवस्था पाहून तिला धक्का बसला. तिथे उंदीर, घुशी, माशा यांचे साम्राज्य होते. जखमी सैनिकांना गलिच्छ पलंगांवर किंवा जमिनीवरच ओळीने ठेवले होते. फ्लॉरेन्स आणि तिच्या गटाने संपूर्ण हॉस्पीटल स्वच्छ केले, पौष्टिक जेवण बनवले आणि रुग्णांची देखभाल केली.



दररोज रात्री फ्लॉरेन्स कंदिलदिवा घेऊन प्रत्येक रुग्णाच्या पलंगाजवळ जात असे आणि सगळे सैनिक आरामात झोपलेले आहेत याची खात्री करून घेत असे.

सैनिक फ्लॉरेन्सला *लेडी विथ द लॅंप* म्हणू लागले. ते फ्लॉरेन्सच्या येण्याची वाट पाहू लागले. फ्लॉरेन्स कंदिलदिवा घेऊन वॉर्डमध्ये येई तेव्हा तिची सावली पलंगावर पडत असे. काही सैनिक हाथ पुढे करून तिच्या सावलीला मायेने स्पर्श करत असत.









फ्लॉरेन्स कित्येकदा रात्री झोप न घेता आपल्या कामात दंग राहात असे. परिणामी, मे 1855 मध्ये ती स्वतःच खूप आजारी पडली. दोन आठवडे ती मृत्युच्या छायेत जगत होती. नंतर हळूहळू तिची तब्येत सुधारत गेली. काही महिन्यांनंतर ती पुन्हा आपल्या कामात व्यस्त झाली.

पार्थेनोपने पत्रात फ्लॉरेन्सला लिहिले, “लोकांचं तुझ्यावर खूप प्रेम आहे.” फ्लॉरेन्सवर लोकांनी अनेक कविता व गीते रचली. तिच्या सन्मानार्थ ते आपल्या मुलींचे नाव *फ्लॉरेन्स* ठेवू लागले. फ्लॉरेन्सच्या नावाने “नाइटिंगेल निधी” उभारला गेला. लोकांनी त्याला भरभरून देणग्या दिल्या. बऱ्याचशा देणग्या सैनिकांनी दिल्या. या निधीतून फ्लॉरेन्सने नर्सेससाठी एक शाळा सुरू केली.


Fund




1856 साली क्रिमियन युद्ध संपले. त्यानंतर फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या सन्मानार्थ अनेक समारंभ आयोजित करण्यात आले. पण युद्धात असंख्य लोक मारले गेले होते. त्यामुळे फ्लॉरेन्सला समारंभ साजरा करावेसे वाटत नव्हते. ती गुपचुप घरी आली आणि समारंभात सहभागी होण्याचे टाळले.



एव्हान फ्लॉरेन्सचे वय छत्तीस वर्षे झाले होते. अजूनही ती तरुणच होती पण आजारामुळे काहीशी अशक्त झाली होती. तेव्हापासून पुढील पन्नास वर्षे तिच्या मृत्यूपर्यंत फ्लॉरेन्स जास्तीतजास्त घरीच राहिली. तिने घरातूनच आपले काम सुरू ठेवले. घरात तिच्या सभोवती सतत कागद, वह्या आणि पाळीव मांजरींचा गराडा असे.


ब्रिटिश सैनिकांना चांगल्या दर्जाच्या आरोग्यसुविधा पुरवल्याबद्दल महाराणी व्हिक्टोरियाने फ्लॉरेन्सची प्रशंसा केली आणि तिच्या कामाला पाठिंबा दिला. महाराणीने एक *रॉयल कमिशन* स्थापन केले. फ्लॉरेन्सने या कमिशनला ब्रिटिश सैनिकांच्या आरोग्यस्थितीबाबत हजार पानांचा अहवाल दिला. फ्लॉरेन्सच्या या कामामुळे ब्रिटिश सैनिकांचे जीवनमान सुधारले आणि त्यांना अधिक चांगल्या दर्जाच्या आरोग्यसुविधा मिळू लागल्या.





1859 साली फ्लॉरेन्स नाइटिंगेलने लिहिलेली *नोट्स ऑन नर्सिंग* व *नोट्स ऑन हॉस्पीटल्स* ही दोन पुस्तके प्रकाशित झाली. दोन वर्षांनंतर 1861 साली फ्लॉरेन्सने अमेरिकेच्या युद्ध सचिवांना अमेरिकन नागरी युद्धात जखमी झालेल्या सैनिकांसाठी विशेष सैनिक हॉस्पीटल सुरू करण्याचा सल्ला दिला.

1860 साली लंडनमध्ये नर्सेसच्या प्रशिक्षणासाठी *नाइटिंगेल ट्रेनिंग स्कूल* सुरू करण्यात आले. फ्लॉरेन्सने प्रशिक्षित केलेल्या नर्सना *नाइटिंगेल* म्हणत असत. या नर्स आपले काम सुरू करण्याआधी फ्लॉरेन्स नाइटिंगेलचा आशीर्वाद घेण्यासाठी येत. काहीवेळा कुणा *नाइटिंगेल*ला सुदूर भागात काम करण्यासाठी पाठवले जाई. ती *नाइटिंगेल* तिथे पोहोचण्याआधी तिचे स्वागत करण्यासाठी फ्लॉरेन्स फुलांचा गुच्छ पाठवत असे.






*नाइटिंगेल नर्सिंग स्कूल*च्या धर्तीवर युरोप व अमेरिकेतही अनेक नर्सिंग स्कूल सुरू करण्यात आली.

1907 साली वयाच्या सत्त्याऐंशिव्या वर्षी इंग्लंडचा राजा एडवर्ड सातवा याने फ्लॉरेन्स नाइटिंगेलला ऑर्डर ऑफ मेरिट या सर्वोच्च ब्रिटिश पुरस्काराने सन्मानित केले. हा पुरस्कार प्राप्त करणारी ती पहिलीच स्त्री होती.

13 ऑगस्ट 1910 रोजी वयाच्या नव्वदाव्या वर्षी फ्लॉरेन्स नाइटिंगेलचे झोपेतच निधन झाले. पण तिचे कार्य आजही जिवंत आहे. तिने आपल्या योगदानाने हॉस्पीटल्सची स्थिती सुधारली. तिने नर्सिंग व्यवसायाला महत्त्व आणि आदर प्राप्त करून दिला. फ्लॉरेन्सने तिच्या सभोवतालचे जग अधिक सुखकर बनवण्यास मदत केली.





महत्त्वाच्या घटना

1820	12 मे रोजी फ्लॉरेन्सचा इटलीमध्ये जन्म.
1837	7 फेब्रुवारी रोजी तिने डायरीत लिहिले, "परमेश्वराने त्याची सेवा करण्यासाठी मला बोलावलंय."
1839	इंग्लंडची महाराणी व्हिक्टोरियाची भेट.
1854	इंग्लंडने क्रिमियन युद्धात भाग घेतला. फ्लॉरेन्स नाइटिंगेल काही नर्सना घेऊन तुर्कस्थानात गेली आणि तेथील जखमी सैनिकांची शुश्रुषा केली.
1856	क्रिमियन युद्धाची संमाप्ती. जुलैमध्ये ब्रिटिश सैनिकांच्या शेवटच्या तुकडीने तुर्कस्थान सोडले. फ्लॉरेन्स इंग्लंडला परतली.
1859	फ्लॉरेन्सची दोन पुस्तके – *नोट्स ऑन नर्सिंग* व *नोट्स ऑन हॉस्पीटल्स* प्रकाशित.
1860	इंग्लंडमध्ये *फ्लॉरेन्स नाइटिंगेल स्कूल ऑफ नर्सिंग*ची स्थापना.
1907	राजा एडवर्ड सातवाकडून ऑर्डर ऑफ मेरिट पुरस्कार.
1910	13 ऑगस्ट रोजी लंडनमध्ये निधन.